**महाराष्ट्रातील नागरी भागात पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उभारण्याच्या कामास सुनियोजितपणे चालना देण्याची जबाबदारी "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL)" आणि त्याची सहयोगी "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (MUIDCL)" या संस्थांवर सोपविण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक**: एनयुआय-२००९/पर्या/प्र.क्र.१७५/नवि-३३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : ३१ ऑगस्ट,२००९

**प्रस्तावना** :- महाराष्ट्रात सध्या ४२ टक्के नागरीकरण झाले असून औद्योगिकीकरणाचा वेग सुध्दा झपाटयाने वाढत आहे. वाढते नागरीकरण व औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचा -हास व प्रदूषणाच्या समस्या उद्‌भवत आहेत.

प्रदुषण नियंत्रणासाठी उद्योजकांवर व स्थानिक स्वराज्य संस्थांवर पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६, जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा , १९७४ (सुधारणांसह) व हवा (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ (सुधारणांसह) इत्यादी कायदयांअंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यांत येते. परंतु, पर्यावरण संनियंत्रणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याने, नैसर्गिक संसाधनांचे प्रदूषण टाळण्यासाठी वा नियंत्रणात आणण्यासाठी ठोस सर्वांगिण उपाय म्हणून सदर कायदेशीर तरतुदी पूर्णत: यशस्वी ठरत नाहीत.

यासाठी राज्यात नागरी व औद्योगिक क्षेत्रात निर्माण होणा-या घनकचरा, सांडपाणी इत्यादी प्रदूषकांच्या संनियंत्रणासाठी त्या त्या क्षेत्रात / भागात निकडीनुसार सर्वसमावेशक पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे काळाजी गरज ठरली आहे. या अनुषंगाने राज्यातील नागरी भागात पर्यावरण पूरक पायाभूत सुविधा उभारण्याच्या कामास सुनियोजितपणे चालना देण्याची जबाबदारी एका विशिष्ट संस्थेकडे सुपूर्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने सांगोपांग विचार करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय**:-

I) राज्यात नागरी भागात पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उभारण्याच्या कामास सुनियोजितपणे चालना देण्याची जबाबदारी "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL)"आणि त्याची सहयोगी "महाराष्ट्र अर्बन

इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (MUIDCL)" या शासन प्रणीत संस्थांवर सोपविण्यात येत आहे.

II) महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL) व महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (MUIDCL) या कंपन्यांनी खालील स्वरुपाच्या पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा नागरी भागात संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत:-

१) नागरी सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर प्रकल्प
२) घनकचरा व्यवस्थापन, घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट, कच-याचे प्रमाण न्यूनत्तम करणे, कच-याचा पुनर्वापर व ऊर्जा निर्मिती विषयक प्रकल्प.
३) बायोमेडीकल कचरा प्रक्रिया/ विल्हेवाट प्रकल्प
४) इलेक्ट्रॉनिक व अजैविक घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा/प्रकल्प वतद्नुषंगिक रिसोर्स रिकव्हरी प्रकल्प
५) महानगर क्षेत्रात निर्माण होणारा घातक घनकचरा (Toxic waste) व्यवस्थापन यंत्रणा/प्रकल्प
६) पाणी पुरवठा प्रकल्प तसेच पाणीपुरवठा/मलनिःस्सारण प्रकल्पांच्या संदर्भात ऊर्जा बचतीचे प्रकल्प.
७) क्लीन डेव्हलपमेंट मॅकनिझम(Clean Development Mechanism) वर आधारित प्रकल्प

II) नागरी भागात पर्यावरणपूरक पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्याच्या कामात आवश्यक ते सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL)"आणि त्याची सहयोगी "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (MUIDCL)" या कंपन्यांवर सचिव (पर्यावरण) यांना संचालक म्हणून संचालक मंडळावर घेण्यात यावे असे निर्देशित करण्यात येत आहे.

III) "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL)" व त्याची सहयोगी "महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (MUIDCL)" या संस्थांनी वरीलप्रमाणे पर्यावरणपूरक सुविधा विकसित करण्याची तातडीची निकड लक्षात घेता यासंबंधीच्या प्रकल्पांच्या विकासासाठी सर्वसाधारणपणे ३० टक्के निधी राखून ठेवावा, जेणेकरुन अशा पायाभूत सुविधांच्या विकासास प्राधान्यक्रम मिळेल.

IV) या व्यतिरिक्त "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL)" व त्याची सहयोगी "महाराष्ट्र अर्बन इंन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट

कंपनी लिमिटेड (MUIDCL)" या संस्था नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्या तांत्रिक सहाय्याने कार्बन क्रेडिट (Carbon Credit) व क्लीन डेव्हलपमेंट मेकॅनिझम (Clean Development Mechanism) व पर्यावरण विषयक परामर्श उपलब्ध करुन देतील, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाबाबत कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण सत्र आयोजित करतील, पर्यावरणपूरक उपाययोजनांकरिता एक रिसोर्स केंद्र (Resource Centre) म्हणून कार्य करतील व शासनास पर्यावरणविषयक धोरण किंवा निर्णय घेण्याकरिता आवश्यक ते तांत्रिक सहकार्य करतील.

V) नागरी भागात पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा प्रकल्प विकसित करण्यासाठी व वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी वर्ष २००९-१० पासून ५ वर्षांसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांचेकडे प्रतिवर्षी जमा होणा-या "पाणी सेस" निधीपैकी १० टक्के निधी महाराष्ट्र अर्बन इंफ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड या संस्थेच्या नियंत्रणाखाली असलेल्या "महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी (MUIF)" मध्ये वर्ग करावा असे आदेशित करण्यात येत आहे.

प्रस्तुत शासन निर्णय पर्यावरण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,**

31/8/2009

**( मनु कुमार श्रीवास्तव )**
**सचिव (नगर विकास)**

**प्रत,**

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.राज्यमंत्री (न.वि.) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र अर्बन इंफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लि.(MUIDCL)
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. (MUIFTCL)
उप सचिव (नवि-७) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (नवि-३३)

E: UD-33/SWM/CR-175-09 GR.lwp